**- प्रकरण चौथे -**

**सांगली सहकारी डेअरी कुपवाड**

## प्रकरण पहिले

### १·१ सहकाराची संकल्पना ( Concept of Co-Operation) :-

"सहकार" Co-Operation हा शब्द मूळ लॅटिन "कोऑपररी" 'Co-Operari' या शब्दापासून आलेला असून ( Co ) "को" याचा अर्थ सह आणि ( Operari ) याचा अर्थ काम करणे असा आहे· दोन्ही शब्दांचा एकत्रितपणे विचार केल्यास "सहकार" या संकल्पनेचा शब्दशः अर्थ परस्पर सहाय्य करणे, एकमेकास मदत करणे किंवा सर्वांचा हितासाठी संघटित व एकत्रित काम करणे असा आहे· या दृष्टीने सहकार ही कल्पना मानवी इतिहासाइतकीच जुनी आहे· कारण एखादे काम स्वतःपुरते आणि स्वतंत्ररित्या करण्यापेक्षा आपल्या कुटुंबातील आणि नात्यातील तसेच मित्रांच्या सहाय्याने केल्यास ते काम जलद गतीने, उत्कृष्ठ दर्जाचे व मोठ्या प्रमाणात होते· याची जाणीव मानवास अगदी सुरूवातीच्या काळात झाली· अगदी वन्यावस्थेत देखील एकमेकांच्या मदतीने व परस्पर सहकार्याने मानव आपली प्रगती करीत होता· एकत्रित राहण्याची, एकमेकांच्या सुखदुःखात सहभागी होण्याची व एकत्रित काम करण्याची मानवी प्रवृत्ती सहज व नैसर्गिक आहे·

थोडक्यात सहकार ही लोकशाही, चारित्र्य, बंधुभाव, शांतता आणि प्रगती या अधिष्ठानावर आधारलेली अशी एक आदर्श समाजव्यवस्था होय· की जीच्यामध्ये समान निष्ठा असणारे लोक आपल्या कल्याणासाठी एकत्र येत असतात·

### १·२ औद्योगिक क्रांतीतून सहकाराचा उगम :-

सहकाराची संकल्पना व कार्यपध्दती आज जगभर लोकप्रिय झालेली आहे· १८ व्या शतकाच्या अखेरीस औद्योगिक क्रांतीचे सामाजिक व आर्थिक परिणाम तीव्रतेने जाणवू लागले· औद्योगिक क्रांतीमुळे यंत्राधिष्ठीत व भांडवलाधिष्ठीत

अर्थव्यवस्था उदयास आली. कारखानदारीचा उदय झाला. उत्पादनात प्रचंड प्रमाणात वाढ झाली. परंतु भांडवलशाहीमुळे समाजात प्रचंड प्रमाणात विषमता आली. आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण झाले. तीव्र स्पर्धा, जीवनावश्यक वस्तूंच्या किंमतीत होणारी प्रचंड वाढ, साठेबाजी भ्रष्टाचार, राहणीमानाचा सतत खालावणारा दर्जा या सर्वामुळे सामान्य श्रमिक वर्ग भरडून निघत होता. वाढत्या लोकसंख्येने बेकारी व गरिबीचे प्रमाणही वाढतच राहिले. यातूनच भांडवलदारांचा वर्ग व श्रमिकांचा वर्ग निर्माण झाला. परंतु या निराशाजनक वातावरणातही श्रमिक जनतेला एक आशेचा किरण दिसला.

१८४४ मध्ये इंग्लंडमध्ये रॉचडेल येथे सर्वसामान्य कष्टकरी विणकरांनी जीवनावश्यक वस्तू स्वस्त व रास्त दरात मिळाव्यात म्हणून "ग्राहक सहकारी संस्थेची स्थापना केली". यातूनच सहकारी संस्थांचे व सहकारी क्षेत्रांचे साम्राज्य उभे ठाकले.

१.३ <u>सहकार</u> :- (व्याख्या)

जगातील विविध देशात सहकाराची चळवळ वेगवेगळ्या काळात सुरू झाली. त्यामुळे सहकार संज्ञेच्या मान्यवर व्यक्तींनी केलेल्या व्याख्येत एकमत व समानता आढळत नाही. सामाजिक विचारवंत, धार्मिक विचारवंत, अर्थशास्त्रज्ञ इत्यादिंनी आपल्या व्याख्येतून सहकाराबद्दलच्या कल्पना स्पष्ट केल्या आहेत. काही व्याख्या पुढीलप्रमाणे :

१) <u>सी.आर.के.</u> -

"निस्वार्थी वृत्तीने व्यापार किंवा व्यवहार करण्यासाठी दुर्बलतेतून अस्तित्वात आलेली संस्था म्हणजे सहकारी संस्था होय. तसेच सभासदांनी सहकारी संस्थेमार्फत केलेल्या व्यवहारांच्या प्रमाणात संस्थेच्या नफ्यात भागीदार होता येईल, या अटीवर संस्थेचा कारभार चालविण्यात येतो".

२) सर होरेस प्लंकेट -

"व्यक्तीच्या संघटनेतून परिणामकारक ठरणारे स्वावलंबन म्हणजे सहकारी चळवळ होय. सहकाराची तीन उद्दिष्ट्ये आहेत. उत्तम शेती, उत्तम व्यवसाय व उत्तम राहणीमान".

३) डब्ल्यू.पी.वटकिन -

"एकता लोकशाही, समता आणि स्वातंत्र्य या तत्वावर आधारलेली सामाजिक संघटना म्हणजे सहकार होय".

४) भारतीय सहकारी कायदा -

"सहकारी तत्वानुसार आपल्या सभासदांचे आर्थिक हितरक्षण व हितसंवर्धन करनारी संस्था म्हणजे सहकारी संस्था होय".

५) को-ऑपरेटीव्ह प्लॅनिंग कमिटीने केलेली व्याख्या -

"स्वत:च्या आर्थिक उन्नतीसाठी स्वेच्छेने आणि समानतेच्या भावनेने व्यक्तींनी स्थापना केलेली संघटना म्हणजे सहकारी संस्था होय".

६) पी.एच.कॅसलमन -

"सामाजिक आशय असणारी अर्थपध्दती म्हणजे सहकार होय".

"Co-Operation is an economic system with a social content."

वरील सर्व व्याख्यांचा अभ्यास करताना सहकाराची काही वैशिष्ठ्ये प्रकर्षाने जाणवतात ती पुढीलप्रमाणे

## १.४ सहकारी संस्थेचे स्वरूप व वैशिष्ट्ये :-

कोणत्याही सहकारी संस्थेचे सभासद सामूहिक प्रयत्नातून त्यांच्या समान गरजा पूर्ण करीत असतात. त्यासाठी सहकाराची तत्वे पाळली जातात. जसे निस्वार्थ वृत्ती, काटकसर, परस्पर सहाय्य, स्वावलंबन स्वसेवा इत्यादी सहकारी चळवळीतून सामाजिक आर्थिक आणि नैतिक प्रगती होते. त्यासाठी प्रत्येक सभासदाचा समान दर्जा, समान हक्क, नफा-तोट्याची न्याय वाटणी आणि सामूहिक नियंत्रण इत्यादी मार्गांनी सहकारी संस्था चालविली जाते.

### १) सहकारी संस्था - व्यक्तींची संघटना -

सहकारी संस्था ही व्यक्तींची संघटना आहे. समान आर्थिक गरजा असणाऱ्या व्यक्ती एकत्रित येऊन सहकारी संस्था स्थापन करीत असतात. या गरजा एकत्रितरित्या सोडविता येतील अशी खात्री त्यांना वाटते. व या हेतूनेच सहकारी संस्था स्थापन केली जाते. या व्यक्तींवर सहकारी संस्था स्थापन करण्यासाठी सक्ती केलेली नसते. पण स्वखुशीने एकत्रित येऊन या व्यक्ती सहकारी संस्था स्थापन करतात. त्याचप्रमाणे अलिकडील काळात अनेक सहकारी संस्था एकत्रित येऊन सहकारी संघ स्थापन करू लागले आहेत.

### २) सहकारी संस्था - एक उद्योगसंस्था -

सहकारी संस्था म्हणजे उत्पादन, व्यापार, सेवा इत्यादी आर्थिक व्यवहार करणारी उद्योगसंस्था आहे. सहकारी संस्थेच्या सभासदांनी स्वतःच्या भांडवलावर व जबाबदारीवर व्यावसायिक धोके पत्करून सुरू केलेले एक व्यावसायिक धाडस सहकारी संस्था करीत असते.

३) सेवाभाव -

समाजातील दुर्बल व्यक्तींना कमी किंमतीत वस्तू आणि सेवांचा पुरवठा करणे हा सहकारी संस्थांचा प्रधान हेतू असतो. त्यामुळे सहकारी संस्थांचे कार्य सेवाभावावर अधिक दृष्टी ठेऊन चालविले जाते.

४) समानतेची वागणूक -

सहकारी संस्थेत प्रवेश करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस समानतेची वागणूक मिळते. तेथे जात, धर्म, पंथ, सामाजिक दर्जा किंवा प्रतिष्ठा, आर्थिक परिस्थिती इत्यादिंचा विचार केला जात नाही.

५) विपणन व्यवस्थेतील खर्च कमी होतो -

सहकारी विपणन व्यवस्थेत हा खर्च खाजगी विपणन व्यवस्थेच्या तुलनेत फारच कमी असतो. परिणामी ग्राहकांना रास्त किंमतीला वस्तूंचा पुरवठा करणे शक्य होते.

६) आर्थिक विषमता कमी होते -

सहकारी चळवळीमुळे आर्थिक दृष्ट्या दुर्बल व कमकुवत व्यक्तींची साधन सामुग्री एकत्रित केली जाते व भांडवलदारांना मिळणारे लाभ उठविण्याचा प्रयत्न केला जातो. साहजिकच सहकारी चळवळ चांगली रुजल्यास त्या समाजात आर्थिक विषमता कमी होते व वर्गसंघर्ष संपुष्टात येण्यास मदत होते.

७) सहकारी ही एक आर्थिक व सामाजिक चळवळ -

सहकारी संस्थेचे सभासदांसाठी वस्तू आणि सेवांचे व्यवहार करणारी संघटना एवढे तिचे स्वरुप राहात नाही. तिच्याकडे देशात शांतता-पूर्ण मार्गाने आर्थिक आणि सामाजिक बदल घडवून आणण्याचे एक उत्कृष्ठ साधन म्हणून पाहिले

जाते. विकसनशील देशांत आर्थिक आणि सामाजिक क्रांती होणे आवश्यक असते. सहकारी चळवळ देशातील आर्थिक आणि सामाजिक उद्दिष्ट्ये साध्य करण्याच्या कामी मदत करते.

८) अधिक्यात सहभाग -

सहकारी संस्थेवर सभासदांचे नियंत्रण असते. सर्वजण संस्थेच्या कार्यात भाग घेतात. संस्थेवर व्यवसायाद्वारे मिळणारे अधिक्य किंवा नफा हा सभासदांनी संस्थेबरोबर केलेल्या व्यवहारांच्या प्रमाणात परत केला जातो.

९) मागणी पुरवठ्यातील समतोल -

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत नफा वाढविण्यासाठी कृत्रिम टंचाई व भाववाढ करण्यात येते. त्यामुळे अर्थव्यवस्थेत वस्तूंच्या मागणी पुरवठ्यात नेहमी चढउतार होतात व त्यामुळे अस्थिरता निर्माण होते. सहकारी चळवळ चांगली रुजल्यास व परिपक्व झाल्यास वस्तूंच्या मागणी पुरवठ्यात सतत समतोल साधण्याचा प्रयत्न केला जातो. परिणामी अर्थव्यवस्थेत स्थिरता प्राप्त होते.

सारांश -

सहकारी चळवळ ही आर्थिक चळवळ आहे, तशीच सामाजिक चळवळ आहे. भारतासारख्या समाजवादी समाजरचना प्रस्थापित करण्याचे उद्दिष्ट असणाऱ्या देशात आर्थिक प्रगतीबरोबरच सामाजिक परिवर्तनाची आवश्यकता आहे. हा बदल क्रांतीच्या माध्यमातून किंवा परिवर्तनाच्या माध्यमातून करता येतो. सहकारी चळवळ म्हणजे सामाजिक परिवर्तनाचे उत्कृष्ठ माध्यम आहे.

सहकाराची तत्वे - Principles of Co-operation.

सहकारी संस्थांचे स्वरुप स्पष्ट होण्यासाठी सहकारी तत्वांची सविस्तर चर्चा आवश्यक ठरते. सहकारी तत्वे कशास म्हणावे याबद्दल काही शास्त्रज्ञांचे मत पुढीलप्रमाणे :

१) जॉर्ज डेव्हिस -

"सहकारी संघटन प्रकाराचे अस्तित्व व कार्यपध्दती ठरविणाऱ्या नियमांचा संच म्हणजे सहकारी तत्वे होय."

२) आय.सी.ए. :-

"सहकारी चळवळीची उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी अत्यावश्यक नियम म्हणजे सहकारी तत्वे होय."

१.५ सहकाराची तत्वे :-

१) ऐच्छिक व खुले सभासदत्व :-

सहकारी संस्थांचे सभासदत्व ऐच्छिक आणि खुले असले पाहिजे. सहकारी चळवळ आणि खुले सभासदत्व असेच समीकरण आहे. ऐच्छिक व खुले सभासदत्व स्वीकारण्यासाठी किंवा रद्द करण्यासाठी कोणत्याही व्यक्तीवर सक्ती केली जात नाही. या दृष्टीने सहकाराचे हे तत्व अत्यंत महत्वाचे आहे.

एखाद्या सहकारी संस्थेच्या हितसंबंधाशी व उद्दिष्ठाशी एकनिष्ठ असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला या तत्वानुसार सभासदत्व दिले जाते. कोणत्याही कारणामुळे सभासदत्व नाकारता येत नाही.

खुले सभासदत्व याचा अर्थ कोणालाही मुक्त प्रवेश किंवा हक्काने प्रवेश असा नाही. सहकारी संस्था ज्या उद्दिष्टाने स्थापन होते, त्यामध्ये खऱ्या अर्थाने सहभागी होऊ शकणाऱ्या सर्व व्यक्तींना संस्थेचे सभासदत्व दिले जावे.

२) लोकशाही नियंत्रण :-

सहकारी चळवळीचे अत्यंत महत्वाचे तत्व म्हणजे सहकारी संस्थेचा कारभार लोकशाही पध्दतीने चालतो. रॉचडेल प्रणेत्यांनी लोकशाही नियंत्रण

या तत्वाचा आवर्जुन उल्लेख केला. त्यांच्या मते लोकशाही नियंत्रण पुढीलप्रमाणे राबविले जाते.

१. एक सभासद - एक मत - सभासदाच्या भांडवलाचा, सामाजिक प्रतिष्ठेचा किंवा त्याच्या आर्थिक परिस्थितीचा आणि मताचा संबंध जोडला जात नाही.

२. प्रतिनीधीमार्फत मतदान करता येत नाही.

३. सहकारी संस्थेचा कोणताही निर्णय सभासदांच्या बहुमताने घेतला जातो.

४. प्रत्येक सभासदाला संस्थेच्या कार्याची माहिती देण्याची किंवा अहवाल देण्याची जबाबदारी व्यवस्थापकीय समितीवर असते.

५. प्रत्येक सभासदाला संस्थेच्या हिशेब वह्या पाहण्याचा अधिकार असतो.

६. सहकारी संस्थेच्या सर्व सभासदांना सतत शिक्षण व प्रशिक्षण देण्यात येते.

या प्रकारे सहकारी संस्थेचे व्यवस्थापन असल्याने त्यास लोकशाही नियंत्रण म्हणतात.

३) <u>लाभांश वाटप</u> :-

सभासदांनी संस्थेच्या व्यवहारातून निर्माण होणाऱ्या अधिकाऱ्याचे वितरण सभासदांमध्ये त्यांनी केलेल्या व्यवहाराच्या प्रमाणात केले जाते. हे महत्वाचे तत्व प्रथम रॉचडेल पायोनिअर्सनी मांडले. या तत्वामुळे सभासदांना वस्तू आणि सेवांचा पुरवठा किमान खर्चात करण्याचा सहकाराचा उद्देश साध्य होतो.

सहकारी संस्थांनी वर्षभरात किंवा विशिष्ठ कालावधीत सभासदांनी केलेल्या व्यवहारामुळे मिळणारे अधिक्य सभासदांना त्यांनी संस्थेच्या केलेल्या व्यवहाराच्या प्रमाणात वाटले जाते. त्यांनी संस्थेच्या धारण केलेल्या भाग भांडवलाच्या प्रमाणात नाही, या तत्वामुळे एक प्रकारे सभासदांच्या सहकार निष्ठेत

वाढ होऊन सभासद आणि संस्था यांच्यातील संबंध दृढ होण्यास मदत होते.

सहकारी संस्थांनी कमविलेल्या नफ्याचे म्हणजेच लाभांशाचे वाटप करत असताना सभासद व्यक्तीच महत्वाची असते. प्रत्येक सभासदाने संस्थेबरोबर किती व कसा व्यवहार केला आहे. त्याप्रमाणे लाभांशाचे वाटप केले जाते. अर्थातच लाभांशाची वाटणी कशी करावयाची हे त्या संस्थेचे सभासद कायद्यातील तरतूदीप्रमाणे करत असतात. लाभांशाचे वाटप करत असताना विस्तार निधी, सेवा निधी, शिक्षण निधी अशा तरतूदी करून ठेवणेही आवश्यक असते.

४) <u>भांडवलावर मर्यादित व्याज</u> :-

भांडवलावर मर्यादित व्याज हे सहकारी संस्थेचे आणखी एक महत्वाचे तत्व होय. अलिकडच्या काळात भांडवलावर व्याज देणे अयोग्य मानले जात नाही कारण भांडवल हा देखील उत्पादनाचा एक घटक आहे. त्यास इतर घटकाप्रमाणे योग्य मोबदला मिळाला पाहिजे. भांडवलावर मर्यादित व्याज देण्यामागील महत्वाची भूमिका म्हणजे सहकारी संस्थांनी नफा प्राप्तीच्या मागे लागू नये. आणि भांडवल या घटकाचे सहकारी संस्थांत वर्चस्व निर्माण होऊ नये. भांडवलावर मर्यादित व्याज देऊन शिल्लक राहणारे अधिक्य संस्थेकडे रहावे आणि त्याची वाटणी सर्वसाधारण सभेने घेतलेल्या निर्णयानुसार केली जावी. या तत्वामुळे आर्थिक समता प्रस्थापित होण्यास एक प्रकारे मदतच होईल.

५) <u>सहकार प्रशिक्षण</u> :-

आधुनिक सहकारी चळवळीच्या प्रणेत्यांनी रॉशडेल प्रणेत्यांनी सहकारी चळवळ प्रभावी व परिणामकारक होण्यासाठी सहकारी शिक्षण अत्यंत महत्वाचे मानले. इतकेच नव्हे तर सहकारी शिक्षणाशिवाय सहकारी चळवळीचा योग्य प्रसार होणार नसल्याचे मत व्यक्त केले.

प्रा. डी.जी. कर्वे यांनी सहकारी शिक्षणाचे महत्व प्रभावी शब्दांत स्पष्ट केले आहे. त्यांच्या मते सहकारी चळवळीच्या अस्तित्वासाठी सहकारी शिक्षणाच्या कोणत्याही बाजूकडे दुर्लक्ष करणे सहकारी संस्थेला फायद्याचे नसते.

सन १९६६ मध्ये आय.सी.ए. कमिशनने सहकारी शिक्षणाचा एक तत्व म्हणून पुनरुच्चार केला कमिशनच्या मते सहकारी शिक्षणाचे स्वरुप पुढीलप्रमाणे आहे.

१. सभासदांना सहकारी शिक्षण.
२. पदाधिकाऱ्यांना सहकारी शिक्षण.
३. संभाव्य सभासदांना सहकारी शिक्षण.

६) <u>सहकारांतर्गत सहकार</u> :-

"सहकारांतर्गत सहकार" हे तत्व आंतरराष्ट्रीय सहकार संघटन समिती तज्ञांनी १९६६ मध्ये नव्याने आंतर्भूत केले. याला विकासाचे तत्व असेही म्हणतात. सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांनी स्थानिक पातळीवर परस्पर सहकार्य करावे व सहकारी चळवळीच्या प्रगतीस मदत करावी असा या तत्वांचा अर्थ आहे. सहकारी चळवळीच्या प्रगतीसाठी व विकासासाठी सहकारांतर्गत सहकार अत्यंत महत्वाचा आहे. सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांनी एकमेकांशी सहकार्य केल्याशिवाय सहकाराची उद्दिष्ट्ये साध्य होणार नाहीत. म्हणूनच "सहकारांतर्गत सहकार" या नव्या तत्वाचा पुरस्कार करण्यात येतो.

<u>सारांश</u> -

सहकारांतर्गत सहकार हे अत्यंत महत्वाचे तत्व म्हणून मान्य आहे. सहकारी चळवळीच्या प्रगतीसाठी व मानवाच्या परिपूर्ण उन्नतीसाठी विविध पातळीवर सहकारांतर्गत सहकार महत्वाचा व आवश्यक आहे.

७) सहकाराची इतर तत्वे - परस्पर सहकार्यातून स्व-सेवा :-

सहकारी चळवळीचे एक महत्वाचे वैशिष्ट्ये म्हणून परस्पर सहकार्यातून स्व-सेवा या तत्वाचा उल्लेख करण्यात येतो. कारण सहकारी संस्थेत काम करीत असताना एक सभासद सर्वांसाठी व सर्व सभासद एकासाठी मदत करीत असतात.

प्रत्येक सभासदाला स्वतंत्ररित्या आपल्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा करता येत नाहीत. तेव्हा सर्व व्यक्तींची साधनसामुग्री व कौशल्य एकत्र आणल्यास आणि सामूहिकरित्या प्रयत्न केल्यास इतरांना मदत करता येते. तसेच स्वहित देखील साधता येते. या अर्थाने सहकारी चळवळ म्हणजे परस्पर सहकार्यातून स्वहित साधण्याचा प्रयत्न आहे.

८) रोखीचे व्यवहार :-

सहकारी संस्थांनी सर्व व्यवहार रोखीने करावेत. हे तत्व रॉचडेल संस्थापकांनी एक महत्वाचे तत्व मानले होते. रॉचडेल ग्राहक संस्था स्थापनेपूर्वीच्या काळात इंग्लंडमध्ये सहकारी संस्थांनी ग्राहकांना उधारीवर मालाचा पुरवठा करण्याचे धोरण आरंभल्याने अनेक सहकारी संस्था बुडाल्या हा अनुभव जमेस धरता रॉचडेल प्रणेत्यांनी ग्राहक भांडाराच्या नीयमावलीत रोखीचे व्यवहार या तत्वाचा अवलंब केला.

आधुनिक काळात मात्र रोखीचा व्यवहार हे मुलभूत व आवश्यक सहकारी तत्व मानले जात नाही.

९) राजकीय व धार्मिक तटस्थता :-

सहकारी संस्था हा एक व्यवसाय संघटन प्रकार आहे. आपली आर्थिक उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी सर्व सभासदांची एकता फार महत्वाची असते. सहकारी संस्थेतील सभासदांची एकजूट कायमची टिकविण्यासाठी त्या संस्थेचा संबंध कोणत्याही राजकिय पक्षाशी तसेच धार्मिक पंथाशी असता कामा नये. सहकारी संस्थेने एखाद्या राजकिय किंवा धार्मिक हेतूने काम करू नये.

१०) काटकसर तत्व :-

सहकारी चळवळीचे काटकसर हे तत्व प्रामुख्याने पतपुरवठा सहकारी संस्थांच्या संदर्भात अधिक महत्वाचे आहे. कारण सहकारी पतसंस्थेच्या प्रत्येक सभासदाने काटकसर बचत केल्याशिवाय संस्थेजवळ खेळते भांडवल उभे राहणार नाही व गरजवंत सभासदांना कर्ज देता येणार नाहीत. सभासदाने आर्थिक व्यवहार नियोजनपूर्वक विचारपूर्वक व काटकसरीने करावेत; असा अर्थ आहे.

११) प्रसिध्दी तत्व :-

सहकारी संस्था व्यक्तींची संघटना असल्यामुळे तिचे अस्तित्व व प्रगती लोकांच्या पाठिंब्यावर अवलंबून असते. देशात कोणत्या प्रकारच्या सहकारी संस्था कोणत्या भागात आहेत, त्यांची प्रगती कशी आहे, त्यांची संख्यात्मक व गुणात्मक वाटचाल कशी आहे इत्यादी माहिती प्रसिध्द करणे आवश्यक असते. या संदर्भात प्रसिध्दी तत्व मांडण्यात येते.

१.६ सहकाराची उद्दिष्ट्ये :-

सहकाराची मूलभूत उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील :

१) मर्यादित साधनाद्वारे व्यक्तीच्या आर्थिक सामाजिक स्थितीमध्ये सुधारणा घडवून आणने आणि चैतन्यासाठी उत्तेजन देणाऱ्या संधी निर्माण करून देण्यासाठी पुढाकार घेणे.

२) राष्ट्रीय आणि भांडवली साधनात वाढ घडवून आणने आणि काटकसरीला उत्तेजन देणे.

३) आर्थिक क्रिया आणि अधिक्य वितरणातील समानता यावर लोकशाही नियंत्रण ठेवण्यासाठी अर्थव्यवस्थेतील सहभागात वाढ करणे.

४) सामाजिक स्थितीत सुधारणा घडऊन आणणे, आवश्यक क्षेत्रात घर, आरोग्य, शिक्षण आणि दळणवळण इत्यादि बाबतीत पूरक सेवा पुरविणे.

५) सभासदांना सामान्य आणि तांत्रिक ज्ञानाची पातळी उंचविण्यासाठी मदत करणे.

६) अंतर्गत विकास साधून, वैयक्तिक, सामाजिक आणि राष्ट्रीय क्षेत्रात सहसंबंध प्रस्थापित करणे.

७) सभासदांना चांगल्या सेवा पुरविणे.

८) संबंधित दुर्बल घटकांचा विकास घडवून आणणे आणि त्याच ठिकाणच्या व्यक्तींच्या परिस्थितीत सर्व प्रकारे बदल करणे.

## १.७ सहकारी बँकांचे वर्गीकरण :-

सहकारी बँकांचे वर्गीकरण सामान्यपणे पुढीलप्रमाणे केले जाते.

## सहकारी बँका

- शेती पतपुरवठा
  - अल्पमुदत कर्जपुरवठा
    1) राज्य सहकारी बँका
    2) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका
    3) प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्था
  - दिर्घमुदत कर्जपुरवठा
    1) मध्यवर्ती सहकारी भू-विकास बँका
    2) प्राथमिक सहकारी भू-विकास बँका
- बिगर शेती पतपुरवठा
  1) कर्मचा-यांच्या पतसंस्था
  2) मध्यवर्ती सहकारी गृहतारण बँका
     शहरी सहकारी गृहतारण बँका
  3) मध्यवर्ती नागरी सहकारी बँका
     प्राथमिक नागरी सहकारी बँका
  4) औद्योगिक सहकारी बँका
     प्राथमिक औद्योगिक सहकारी बँका

## १.८ भारतातील सहकारी चळवळीचा इतिहास :-

### १९०१ चा फेमिन समितीचा अहवाल -

१९ व्या शतकाच्या अखेरिस भारतातील ग्रामीण भागाची आर्थिक व सामाजिक स्थिती अत्यंत खालावलेली होती. अज्ञान, अंधश्रध्दा, गरीबी, कर्ज, रोगराई, उपासमार अशा विविध समस्यांनी गांजलेली जनता हवालदिल झालेली होती. या सर्व परिस्थितीत शेतकऱ्याला स्वतःला आपली उन्नती व्हावी व त्यासाठी आपण परिश्रम करणे आवश्यक आहे. असे वाटत नव्हते. १८८३ चा भूविकास कायदा ( Land Development Act. ) आणि १८८४ चा शेतकरी कर्ज कायदा ( Agricultrists Loans Act. ) भारतीय समस्यांचे निराकरण करण्यास असमर्थ होते. म्हणूनच १९०१ साली फेमिन कमिशनने आपल्या अहवालात स्पष्टपणे प्रतिपादन केले की सहकारी पतपेढ्या स्थापन करून सहकारी कार्यपध्दतीने ग्रामीण भारताचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

### सर फेडरिक निकोलसन अहवाल -

ग्रामीण जनतेच्या विशेषतः शेतकऱ्यांच्या समस्यांवर प्रभावी उपाययोजना करण्याचे श्रेय तत्कालीन, मद्रास सरकारला दिले पाहिजे. सर फेडरिक निकोलसन यांनी जर्मनीतील रायझेशन सोसायट्याप्रमाणे भारतातही सहकारी संस्था स्थापन कराव्यात अशी महत्वाची शिफारस केली.

### सहकारी चळवळीचे प्रथम पर्व - १९०४ ते १९११ -

१९०४ साली संमत झालेल्या सहकारी पतपुरवठा कायद्याने भारतातील सहकारी चळवळीच्या प्रथम पर्वास प्रारंभ झाला. सर्वसामान्य जनतेमध्ये व कारागिरामध्ये काटकसर, स्वयंसेवा, परस्पर सहाय्य या प्रवृत्ती जोपासण्यासाठी १९०४ चा कायदा करण्यात आला. या कायद्याची प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे होती.

१) एकाच खेड्यात किंवा शहरात राहणा-या कोणत्याही दहा व्यक्तींना सहकारी संस्था स्थापण्यास परवानगी देणे.

२) सहकारी संस्थांचे ग्रामीण व नागरी असे वर्गीकरण करणे.

३) ग्रामीण सहकारी संस्थांची जबाबदारी मर्यादित ठेवणे.

४) सहकारी पतपुरवठा संस्था स्थापन करण्यास परवानगी देणे.

५) सहकारी संस्थांचे कार्यक्षेत्र शक्यतो मर्यादित ठेवणे.

६) वैयक्तिक किंवा वास्तव तारणावर कर्ज देणे.

७) सभासदांची भाग खरेदी करण्याची कमाल मर्यादा रु.१०,०००/- ठेवणे.

८) सहकारी संस्थेचे हिशेब तपासण्याचा अधिकार निबंधकाला देणे.

९) सहकारी संस्थांना प्राप्तीकर, स्टम्पकर, नोंदणीशुल्क माफ करणे.

१०) प्रत्येक राज्यात निबंधक, सहकारी संस्था यांची नियुक्ती करणे.

११) सहकारी संस्थांना कायदेशीर दर्जा देऊन त्यांना निधी उभारणे, कर्ज देणे, व्यवसाय करणे यासाठी मान्यता देणे.

<u>सहकारी चळवळीचे द्वितीय पर्व - १९१२ ते १९१८</u> -

१९१२ साली संमत झालेल्या सहकार कायद्याने भारतीय सहकाराच्या इतिहासात नवीन पर्वाची सुरूवात झाली. १९१२ च्या सहकारी कायद्याच्या प्रमुख तरतूदी खालीलप्रमाणे होत्या.

१) पतपुरवठा व बिगर पतपुरवठा संस्थांमधील फरक संपुष्टात आला.

२) सहकारी संस्थांचा संघ स्थापन करून त्यास नोंदणी देणे.

३) मध्यवर्ती सहकारी संस्थांची जबाबदारी मर्यादित करण्यात आली.

४) ग्रामीण सहकारी संस्थांची जबाबदारी अमर्यादित ठेवली गेली.

५) कोणत्याही एका सभासदाचे भागभांडवल कमाल रु.१,०००/- किंवा संस्थेच्या एकूण भांडवलापैकी एकपंचमांश असावे.

६) हिशेब तपासणी व तत्सम तरतूदी कायम ठेवण्यात आल्या.

७) निव्वळ नफ्यापैकी एक चतुर्थांश नफा निधीच्या स्वरूपात ठेवणे.

या कालखंडात शेती व बिगरशेती संस्थांची मोठ्या प्रमाणावर स्थापना झाली.

## मॅक्लॅगन समितीचा अहवाल - १९१४ -

सहकारी संस्थांच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी व सहकार चळवळीची प्रगती योग्य दिशेने होते आहे किंवा नाही याचा अभ्यास करण्यासाठी सर इ.डी. मॅक्लॅगन यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली. भारतीय सहकार चळवळीची निकोप वाढ होण्यासाठी या समितीने परिश्रमपूर्वक उत्कृष्ठ व अभ्यासपूर्ण अहवाल सादर केला. सहकार चळवळीची अनियोजित वाढ होण्यामुळे सहकार क्षेत्रास वाईट परिणामांना तोंड द्यावे लागेल असा परखड इशारा या समितीने दिला. व संस्थेची स्थापना काळजीपूर्वक व विचारांतीच झाली पाहिजे अशी सूचना दिली. त्याचप्रमाणे सहकारी कार्यकर्त्यांनी निष्ठेने व तळमळीने उत्स्फूर्तपणे काम करणे आवश्यक आहे.

## सहकारी चळवळीचे तृतीय पर्व - १९१९ ते १९२९ अनियोजित विकास -

पहिल्या महायुध्दानंतर १९१९ साली भारत सरकारने सहकाराचा सुधारणा कायदा संमत केला. या कायद्याप्रमाणे सहकार हा विषय राज्य सरकारच्या अखत्यारित सोपविण्यात आला. त्यामुळे राज्य सरकारला सहकारी संस्थांच्या विकासाकडे लक्ष देणे शक्य झाले. युध्दानंतर औद्योगिक परिस्थितीत बदल घडून आले.

वस्तूंचे भाव वाढत होते. सर्वसामान्य जनतेचे राहणीमान खालीघसले होते. त्यामुळे समान आर्थिक गरजा भागविण्यासाठी एकमेकांना मदत करून सर्वांचे हितसंबंध जपण्यासाठी विविध प्रकारच्या सहकारी संस्थांची स्थापना करण्यात आली. परंतु दुर्दैवाने सहकारी संस्थांच्या संख्येत फक्त संख्यात्मक वाढ झाली. गुणात्मक वाढ झाली नाही. त्यामुळे सहकारी चळवळीस दीशाहीन व ध्येयशुन्य वळण लागण्याचा धोका निर्माण झाला. अनियोजित विकासाच्या दृष्टचक्रातून सहकारी चळवळीस वाचविणे आवश्यक होते. यासाठी विविध समित्यांची स्थापना झाली. या समित्यांनी सहकारी चळवळीची निकोप वाढ होण्यासाठी अनेक शिफारशी केल्या.

सहकारी चळवळीचे चतुर्थ पर्व - १९२९ ते १९३९ - एकत्रीकरण व पुर्नरचना -

या कालावधीत भारतीय अर्थव्यवस्थेलाही जागतीक मंदीचा तडाखा बसला होता. किंमती घसरत होत्या. त्यात शेतमालाच्या किंमतीही खूपच खाली आल्या. शेतकऱ्यांची औद्योगिक परिस्थती खालावली. कर्जाची परतफेड करणे अशक्य झाले व उत्पन्न रोडावल्यामुळे नविन कर्ज घेण्याची आवश्यकता निर्माण झाली. कर्जाच्या थकबाकीचे प्रमाण वाढत होते. त्यामुळे अनेक राज्यांत सहकारी चळवळ थंडावली.

सहकारी संस्थांच्या अपयशास व अधोगतीस जागतीक मंदी हे प्रमुख कारण नसून सहकारी चळवळीतील अंगीभूत दोषच कारणीभूत आहेत असे परखड मत श्री जे.पी. नियोगी यांनी व्यक्त केले.

सहकारी चळवळीतील दोष व त्रुटी दूर करून सहकारी चळवळीचे व सहकारी संस्थांचे एकत्रीकरण व पुनर्रचना करण्याची आवश्यकता निर्माण झाली. या सर्वांचा परिणाम म्हणून सहकारी संस्था विकासाच्या दृष्टीने आगेकूच करू लागल्या.

## रिझर्व बँकेची स्थापना - १९३५ -

या कालावधीत अत्यंत महत्त्वपूर्ण घटना म्हणजे १९३५ साली भारतीय रिझर्व्ह बँकेची स्थापना झाली. आर.बी.आय. या एक प्रभावी घटक म्हणून शेती पतपुरवठा विभाग स्थापन करण्यात आला. शेती पतपुरवठा विषयक सर्व प्रश्नांचा सखोल अभ्यास करण्याचे काम या विभागाकडे सुपूर्त करण्यात आले. १९३७ मध्ये शेतकऱ्यांच्या विविध गरजा भागविण्यासाठी बहुउद्देशीय सहकारी संस्था स्थापन कराव्यात अशी मौलिक सूचना केली.

## सहकारी चळवळीचे पाचवे पर्व - १९३९ ते १९४६ -

दुसरे महायुध्द सुरू झाले. भारतातील सहकारी चळवळीवर महायुध्दाच्या वातावरणाचा अनुकूल परिणाम झाला व प्रगतीच्या दिशेने सहकारी संघटनेची वाटचाल सुरू झाली. महायुध्दाचा परिणाम म्हणजे विशेषत: जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती, शेती उत्पादनाच्या किंमती मोठ्या प्रमाणावर वाढल्या. बाजारात तेजी आली. जुनी कर्जे परत केली गेली. कर्जाच्या थकबाकीचे प्रमाण कमी होऊ लागले. सहकारी संस्था व त्यांच्या सभासदांमध्येही लक्षणीय वाढ झाली. संस्थांचे खेळते भांडवलही वाढले. अशा प्रकारे जागतिक महायुध्दाचा सहकारी चळवळीवर अनुकूल परिणाम झाला.

## प्रा. डी.आर. गाडगीळ समिती -

सन १९४४ मध्ये प्रा. डी.आर. गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखाली भारत सरकारने एका समितीची स्थापना केली. सहकाराची भूमिका विषद करताना गाडगीळ समितीने स्पष्ट केले की, "ग्रामीण अर्थव्यवस्थेचा व विशेषत: ग्रामीण पतपुरवठ्याचा प्रश्न सोडविण्यासाठी सहकाराचा प्रसार व विकास हाच सर्वोत्तम व दीर्घकाळ टिकणारा प्रभावी मार्ग आहे."

सहकाराच्या योग्य विकासाची योजना तयार करण्यासाठी श्री आर.जी. सरैय्या यांच्या अध्यक्षतेखाली नवीन समितीची स्थापना करण्यात आली.

१.९ स्वातंत्र्योत्तर सहकार चळवळ व योजनाबध्द प्रगती :-

१५ ऑगष्ट १९४७ मध्ये भारत स्वतंत्र झाला. भांडवलवाद व कम्युनिष्ट व कट्टर समाजवादी विचारसरणीच्या आहारी न जाता मिश्र अर्थ व्यवस्थेचा सुवर्णमध्य भारताच्या स्वतंत्र व सार्वभौम राजसत्तेने साधला. कल्याणकारी राज्याची कल्पना मान्य केली. सर्वसामान्यांना व सामाजिक तसेच आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या व्यक्तींना संरक्षण देऊन त्यांच्या विकासाचे मार्ग खुले करण्याची जबाबदारी शासनाने स्वीकारली. लोकशाही राज्य पध्दतीचा स्वीकार केला. "बहुजन हिताय" "बहुजन सुखाय" राज्य करीत असताना लोकांचा सहभाग अपेक्षित होता.

औद्योगिक प्रगती झपाट्याने होण्यासाठी आर्थिक नियोजनाचा मार्ग स्वीकारला. १९५० मध्ये पहिली पंचवार्षिक योजना अंमलात आली. १९५१ ते १९९० या कालखंडात देशाने सात पंच वार्षिक योजना पूर्ण केल्या. या सर्व योजनांमध्ये सर्वसामान्य व्यक्तीलाही आद्योगिक नियोजनाच्या कार्यक्रमामध्ये सहभागी करून घेण्यासाठी "सरकार" मार्गाचा व तत्वांचा अवलंब करून घेण्यात आला. स्वतंत्र भारतात सहकार चळवळ फोफावली. सामान्य व्यक्तीपर्यन्त जाऊन पोहोचली. विविध क्षेत्रात विविध गरजा भागविण्यासाठी विविध कामे करणाऱ्या असंख्य सहकारी संस्था स्थापन झाल्या. म्हणूनच आज "भारत म्हटले की सहकार" असे समीकरण तयार झाले आहे. पंचवार्षिक क्षेत्रामध्ये सहकारी क्षेत्राने मौल्यवान कामगिरी बजावली आहे.

## सारांश :-

भारताच्या आर्थिक विकासात सहकारी चळवळीने भूमिका बजावलेली आहे. भारतीय अर्थव्यवस्थेची खाजगी क्षेत्र व सार्वजनिक क्षेत्र अशा दोन क्षेत्रामध्ये विभागणी करण्यात येते. परंतु या दोन क्षेत्राबरोबरच सहकार क्षेत्रही भारतात मोठ्या प्रमाणावर विकसित झाले.
"विना सहकार नही उध्दार" हे भारतातील लोकांना कळून चुकले आहे.

...

## संदर्भ

१) सहकार तत्वे आणि व्यवहार - प्रा. ए.आर. रायखेलकर,
प्रा. अशोक डांगे,
पान नं.१ ते ३३.
प्रकाशक - मेहता पब्लिशिंग हाऊस, कोल्हापूर.

२) सहकार तत्वे आणि व्यवहार - प्रा. सी.जे. जोशी,
पान नं.१ ते ४ - फडके प्रकाशन

३) सहकार - डॉ. अरुणा कौलगुड,
डॉ. मुकुंद तापीकिर
पान नं. ६९ ते ७७ - अनमोल प्रकाशन.

४) सहकार - प्रा. जोशी,
प्रा. कदम,
पान नं.१५ ते २७
प्रकाशन - एम.व्ही. फडके आणि कंपनी.

५) सहकार तत्व आणि व्यवहार - प्रा. पाटील,
प्रा. कुंभार,
पान नं. १ ते१२
प्रकाशन - शांती प्रकाशन.

....